पोलीस आयुक्तालयपिंपरीचिंचवड
स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ, प्रेमलोक पार्क,
पिंपरीचिंचवड ४११०३३
दुरध्वनीक्रमांक- ०२०-२७३५०५५५

दिनांक - २४/०९/२०२४
जा. १३७९८३६

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाचे रिक्त असलेल्या २६२ पदांकरिता आवेदन अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची शारिरीकमोजमाप, मैदानी चाचणी व लेखी परिक्षा घेण्यात आलेली आहे.

प्रचलित शासन निर्णय/परिपत्रक व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) २०११ व (सुधारणा) नियम २०१९ नुसार पोलीस भरती निवड समितीने २६० उमेदवारांची सुधारीततात्पुरती निवड यादी(Provisional Selection List) व १८४ उमेदवारांची तात्पुरती प्रतिक्षायादी(Provisional Waiting List)यादी दिनांक २८/०८/२०२४ रोजीपिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे www.pcpc.gov.in व www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर सुधारित तात्पुरत्या निवड यादीमधील वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी यामध्ये पात्र झालेले उमेदवार, तसेच सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊन सुधारित तात्पुरत्या निवड यादीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांचे समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्राची संबंधित विभागाकडे पडताळणीकरीता पाठविण्यात आलेले आहेत.

वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी, तसेच समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्रे वैध्य असलेबाबत अहवाल प्राप्त झालेले खालील एकुण ०५ नमुद उमेदवार हे पोलीस शिपाई या पदाचे नियुक्तीस पात्र झालेले आहेत. सदरचे उमेदवारांना पोलीस शिपाई या पदाचे नियुक्ती आदेश दिनांक २५/०९/२०२४ रोजीसकाळी ०९.०० वा. पोलीस मुख्यालय, **अंकुश बोऱ्हाडे हायस्कुल, निगडी प्राधिकरण, पुणे ४११ ०४४ पिंपरी चिंचवड येथे** देण्यात येणार आहेत. तरी संबंधित उमदेवारांनी विहीत वेळेत नमुद ठिकाणी हजर राहणेबाबतची नोंद घ्यावी.

| Sr. No. | Application No. | Chest No. | Name | Gender | Caste | Selection |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 220105000003103 | 11458 | Jayashri Paremeshwar Ingale | Female | SEBC | sebc_wr |

**वरील नमुद उमेदवारांनी दिनांक २५/०९/२०२४ रोजी उपस्थित राहताना करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणः-**

१. पुरुष उमेदवारांनी सोबतचे पत्रकासोबत सादर करण्यात आलेला वैयक्तिक माहितीचा नमुना स्वतःचे हस्ताक्षरात अथवा टंकलिखित / संगणकावर भरुन येताना सोबत घेऊन यावा.
२. पुरुष उमेदवारांनी उपस्थित राहते वेळी नजीकच्या काळातील पासपोर्ट साईज १२ फोटो सोबत घेऊन यावेत.

३. पुरुष उमेदवार यांनी हजर होताना मेस अग्रिम व गणवेश सरंजामाकरीता अंदाजे रुपये ५०००/- सोबत ठेवावी.

४. ज्या उमेदवारांनी स्वतःचे आधारकार्ड व पॅनकार्ड तसेच कुटुंबातील ज्या व्यक्तिचे नामनिर्देशन करणार आहेत त्या व्यक्तिचे आधार कार्ड, पॅन कार्ड, चे छायांकीत प्रती सादर केलेल्या नाहीत. त्यांनी येताना सोबत घेऊन यावे.

५. ज्या पुरुष उमेदवारांचे पगारा करीता बँकेमध्ये बचत खाते उघडलेले नाही. त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडून बँकेचा खात`क्रमांक व पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स तसेच दोन चेक ( कॅन्सल केलेले ) येताना सोबत आणणे आवश्यक आहे. राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते असल्यास पासबुकची प्रत सोबत आणणे. प्रशिक्षण केंद्रातील मेस वर्गणी व इतर रक्कम वसुली करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रात पाठवितांना त्यांचे ATM Card आणि धनादेश/चेक बुक सोबत असणे आवश्यक आहे.

६. उमेदवार हे प्रशिक्षण केंद्रामध्ये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई म्हणुन रुजू झालेनंतर प्रशिक्षण कालावधीत मध्यांतर ( Mid Term ) देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

७. उमेदवार हे प्रशिक्षणार्थी म्हणुन प्रशिक्षण केंद्रामध्ये हजर झालेनंतर त्यांना नैमित्तिक रजा वगळून कोणत्याही प्रकारची रजा मंजुर केली जाणार नाही. तथापि, अपरिहार्य कारणास्तव संपुर्ण प्रशिक्षण कालावधीत फक्त ०५ दिवस रजा मंजुर करण्यात येईल. त्या पेक्षा जास्त रजेची आवश्यकता भासल्यास त्या संबंधित प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण चालू ठेवता येणार नाही व सदर प्रशिक्षणार्थीस मुळ घटकात परत पाठविण्यात येईल यांची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

८. उमेदवार हे नवप्रविष्ठ पोलीस म्हणून प्रशिक्षणकेंद्रामध्ये हजर झालेनंतरत्यांना स्वतःचे व नातेवाईकाचे विवाह, तसेच इतर कार्यक्रमासाठी कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येणार नाही याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

९. पुरुष उमेदवारांनी मुलभूत प्रशिक्षणाकरीता आवश्यक असणारे साहित्याची यादी सोबत जोडलेली आहे. त्यानुसार साहित्यासह हजर रहावे.

**(भरती निवड समिती यांचे मान्यतेने)**

**(माधुरी केंदार-कांगणे)**
**पोलीस उप आयुक्त, मुख्यालय**
**पोलीस भरती समिती, पिंपरीचिंचवड**

**मुलभूत प्रशिक्षणासाठी महिला उमेदवारांसाठी आवश्यक असणारे साहित्य खालीलप्रमाणे.**

- मेस ॲडव्हान्स :- रुपये ५०००/- ( अंदाजे )
- खाकीड्रेस :- १ नग.
- खाकी फुल पॅन्ट :- २ नग.
- सफेद टी शर्ट :- २ नग.
- बेल्ट काळ्या रंगाचा :- १ नग.
- सॉक्स :- २ नग ( खाकी व काळे प्रत्येकीदोननग )
- फायबर लाठी :- १ नग.
- डी.एम.एस.शुज :- १ नग.
- कट शुज :- १ नग ( काळ्या रंगाचा )
- पिटी शुज :- १ नग ( ब्राऊन रंगाचा )
- अँकलेट :- १ नग.
- दरी :- १ नग.
- बकेट व मग :- १ नग. ( प्रत्येकी )
- टिफिन बॉक्स :- १ नग.
- बेडींग ( बिस्तारा ) :- १ नग.
- बॅरीकॅप :- १ नग.

1.